ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 10 | JUNE - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर:- सांस्कृतिक राष्ट्रवादाचे मूर्तिमंत प्रतीक"



सहाय्यक प्राध्यापक दिपेश काशिनाथ केकाणे
(M.A., M.Ed., SET-History)
एम. ए. (इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इंग्रजी)
इतिहास विभागप्रमुख
द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड.

प्रा. डॉ. अंकुश मारुती सोहनी
शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालय पाली, ता. सुधागड, जि. रायगड.

## प्रस्तावना:-

लोकमाता अहिल्याबाई होळकर (१७२५-१७९५) या भारतीय इतिहासात एक उल्लेखनीय व्यक्तिमत्त्व म्हणून आपल्याला परिचित आहेत, ज्या सांस्कृतिक राष्ट्रवाद, न्याय्य शासन आणि सामाजिक कल्याण या आदर्शांना मूर्त रूप देतात. माळवा राज्याच्या शासक म्हणून, त्यांनी पितृसत्ताक नियमांना झुगारून आर्थिक समृद्धी, लष्करी ताकद आणि धार्मिक समावेशकता संतुलित करणारे शासन मॉडेल स्थापित केले. त्यांच्या कारकिर्दीत व्यापक पायाभूत विकास झाला, ज्यामध्ये संपूर्ण भारतातील मंदिरे, धर्मशाळा, घाट आणि जलसाठ्यांचे बांधकाम आणि जीर्णोद्धार यांचा समावेश होता, ज्यामुळे हिंदू समाजाचा सांस्कृतिक वारसा बळकट होण्यास मदत झाली.

अहिल्याबाईं चेनेतृत्व प्रगतीशील आणि लोक केंद्रित होते. त्यांची भूमिका ही न्याय, न्याय्य कर आकारणी आणि शेतकरी व व्यापाऱ्यांचे कल्याण सुनिश्चित करणारी होती. कला, साहित्य आणि स्थापत्यशास्त्राचे त्यांचे संरक्षण हे एका सांस्कृतिक पुनर्जागरणाचे प्रतीक होते. ज्याने परदेशी प्रभावांमध्ये स्थानिक परंपरांना बळकटी दिली. अनेक समकालीन शासकांप्रमाणे, त्यांनी धर्मनिरपेक्ष मूल्यांचे समर्थन केले, विविध समुदायांसाठी प्रार्थनास्थळांचे समर्थन केले.

## अ) लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी:-

लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारताच्या इतिहासातील एक महान, लोकहितवादी आणि दूरदृष्टी असलेल्या स्त्री शासिका होत्या. त्या 18 व्या शतकात मालवा प्रदेशाच्या राज्यकर्त्या होत्या आणि त्यांच्या कार्यामुळे त्यांना "लोकमाता" व "पुण्यश्लोक" या उपाधी लाभल्या. भारतीय इतिहासात काही थोर व्यक्तिमत्वं अशी आहेत की ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने संपूर्ण देशाला दिशा दिली. त्यात लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं नाव अत्यंत सन्मानाने घेतलं जातं. त्या केवळ एक पराक्रमी आणि

न्यायप्रिय शासिका नव्हत्या, तर एक आदर्श स्त्री, धर्मप्रेमी, समाजसेविका आणि लोकहितवादी नेत्या होत्या.

अहिल्याबाईं चाजन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर(अहिल्यानगर) जिल्ह्यातील चौंडी या गावात झाला. त्या एका साध्या कुटुंबात वाढल्या. त्यांचे बालपण अत्यंत साधेपणात गेले, पण त्यांच्यात लहानपणापासूनच नेतृत्वगुणआणि संवेदनशीलता दिसून येत होती. त्यांचा विवाह इंदूर संस्थानाचे सेनापती खांडेराव होळकर यांच्याशी झाला. काही वर्षांनी त्यांच्या पतीचा आणि सासऱ्यांचा मृत्यू झाला. अशा परिस्थितीत अनेक स्त्रिया खचून जातात, पण अहिल्यादेवींनी धैर्याने परिस्थितीचा सामना केला. त्यांनी १७६७ साली इंदूर संस्थानाचा कारभार हाती घेतला आणि आपल्या बुद्धिमत्तेने, दृष्टीकोनाने आणि न्यायप्रियतेने एक आदर्श राज्यकारभार केला. त्या दररोज न्यायसभा घेत आणि सामान्य जनतेच्या अडचणींना तोंड देत. त्यांच्या राज्यात कोणतीही अराजकता नव्हती. शेतकऱ्यांना मदत, पाण्याची व्यवस्था, व्यापाऱ्यांना संरक्षण आणि प्रजेची सेवा हे त्यांच्या कारभाराचे मुख्य वैशिष्ट्य होते.

धर्मप्रेमामुळे त्यांनी भारतभर अनेक मंदिरे बांधली आणि जीर्ण मंदिरे दुरुस्त केली. काशी विश्वनाथ, रामेश्वर, सोमनाथ, द्वारका, गंगाघाट अशा अनेक पवित्र स्थळांवर त्यांनी घाट, धर्मशाळा, अन्नछत्रे आणि विहिरी बांधल्या. त्यांच्या या धार्मिक आणि सामाजिक कार्यामुळे त्यांना ''पुण्यश्लोक'' ही उपाधी मिळाली. त्यांनी विधवांच्या मदतीसाठी कार्य केलं, स्त्रियांना सन्मान दिला आणि समाजात एक नवा आदर्श निर्माण केला. अहिल्यादेवी स्वतः अत्यंत साधेपणाने राहायच्या. त्यांचं व्यक्तिमत्व म्हणजे त्याग, कर्तव्य आणि सेवाभाव यांचं मूर्तिमंतरूप होतं.

## ब) अहिल्यादेवी होळकर यांचे सांस्कृतिक राष्ट्रवादातील योगदान:-

भारतीय इतिहासात सांस्कृतिक राष्ट्रवादाची जपणूक आणि विकास करण्यामध्ये अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय संस्कृती, परंपरा आणि धार्मिक वारसा जतन होण्यास मोठी मदत झाली. त्या काळात अनेक मंदिरे आणि धार्मिक स्थळे आक्रमणांमुळे किंवा दुर्लक्षामुळे नष्ट झाली होती. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींनी भारताच्या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. अहिल्यादेवींनी भारतातील विविध तीर्थक्षेत्रांचे पुनरुज्जीवन करून सांस्कृतिक राष्ट्रभावना दृढ करण्याचे कार्य केले. विशेषतः त्यांनी वाराणसी येथील काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करून ते पुन्हा भव्य स्वरूपात उभारले. हे मंदिर हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते. तसेच गुजरातमधील सोमनाथ मंदिर , उज्जैन येथील महाकालेश्वर मंदिर आणि महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर मंदिर यांसारख्या अनेक महत्त्वाच्या मंदिरांच्या विकासासाठी त्यांनी आर्थिक मदत केली. या कामांमुळे भारतातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना नवचैतन्य मिळाले.

अहिल्यादेवींच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी मंदिरांबरोबरच समाजोपयोगी बांधकामे देखील केली. यात्रेकरूंना सोयी व्हाव्यात म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी घाट, धर्मशाळा, विहिरी आणि पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था निर्माण केल्या. गंगा, नर्मदा आणि इतर नद्यांच्या काठावर त्यांनी सुंदर घाट बांधले, जे आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. यामुळे धार्मिक यात्रांना चालना मिळाली आणि भारताच्या विविध भागांतील लोकांमध्ये सांस्कृतिक एकात्मता वाढली.

अहिल्यादेवींच्या या कार्यामुळे भारताच्या सांस्कृतिक वारशाचे जतन झाले आणि लोकांमध्ये धार्मिक व राष्ट्रीय भावना अधिक बळकट झाली. त्यांनी कोणत्याही प्रदेश, जाती किंवा धर्माचा भेदभाव न करता संपूर्ण भारतातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी कार्य केले. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ धार्मिक नव्हते, तर ते सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या दृढीकरणाचे प्रतीक होते.

## क) कार्य:-

लोकमाता अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक अत्यंत तेजस्वी व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्या केवळ एक आदर्श राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचेही मूर्तिमंत प्रतीक होत्या. त्यांचे जीवनकार्य हे भारतीय संस्कृती, परंपरा आणि धार्मिक ऐक्याचे जतन करणारे होते.

**१) राजकीय नेतृत्व आणि न्यायप्रिय शासन: -**

अहिल्याबाईंचे राज्य हे सुशासन, सामाजिक न्याय आणि लोककल्याण यासाठी प्रसिद्ध होते. त्यांनी आपल्या राज्यात कायद्याचे राज्य प्रस्थापित केले आणि स्त्रीशक्तीला नवा आत्मविश्वास दिला. त्या वेळच्या पुरूषप्रधान समाजात एक महिला म्हणून त्यांनी जे नेतृत्व दिले, ते प्रेरणादायी आहे.

**२) धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपणारे कार्य: -**

अहिल्याबाईंनी संपूर्ण भारतभर अनेक मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा यांची निर्मिती केली. काशीचे विश्वनाथ मंदिर, प्रयाग, अयोध्या, उज्जैन, रामेश्वरम, द्वारका, तुळजापूर गंगापूर, नाशिक यांसारख्या पवित्र स्थळांवर त्यांनी पुनर्बांधणी केली किंवा देखभाल केली. त्यांच्या या कार्यातून केवळ धार्मिक निष्ठा नाही, तर भारताच्या सांस्कृतिक ऐक्याचे दर्शन घडते. त्यांनी सर्व धर्म आणि जातींना समानतेने वागवले.

**३) सांस्कृतिक राष्ट्रवादाची मूर्त प्रतिमा: -**

सांस्कृतिक राष्ट्रवाद म्हणजे केवळ राजकीय सीमा नव्हे, तर भाषिक, धार्मिक, सामाजिक आणि ऐतिहासिक परंपरांचे संरक्षण व संवर्धन. अहिल्याबाईंचे कार्य हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानासाठी जे योगदान दिले, त्यातून देशप्रेम, परंपरांवरील श्रद्धा, आणि एकात्मतेचा संदेश मिळतो.

**४) कला आणि संस्कृतीचे संरक्षण: -**

अहिल्याबाई होळकर यांनी कला, साहित्य, आणि संस्कृतीला चालना दिली. त्यांनी आपल्या राज्यात शिल्पकला, स्थापत्यकला आणि साहित्याची महत्त्वपूर्ण वाढ केली. अनेक शास्त्रीय ग्रंथांची प्रतिकृती बनवून ती लोकांसाठी उपलब्ध केली.

**५) शिक्षणाला प्रोत्साहन: -**

त्या काळात महिला शिक्षणावर त्यांनी विशेष लक्ष दिले आणि महिलांच्या उत्थानासाठी अनेक योजनांची सुरूवात केली. त्या नेहमी शाळा आणि शिक्षण संस्थांचे समर्थन करीत होत्या.

**६) धार्मिक सहिष्णुता: -**

अहिल्याबाई होळकर यांना धार्मिक सहिष्णुतेचा पाठिंबा होता. त्यांनी विविध धर्मांच्या पूजास्थळांचा पुनर्निर्माण केला आणि त्यांचा आदर केला. त्या समाजातील विविध समुदायांसाठी एकसमान न्याय आणि सन्मान असावा अशी त्यांनी नेहमीच अपेक्षा केली.

**७) शांतीसाठी कार्य: -**

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या शासनात शांती आणि समृद्धीची स्थापना केली. त्यांनी आपल्या राज्यातील भरण-पोषणासाठी, लोककल्याणासाठी आणि न्यायव्यवस्थेसाठी अनेक सुधारणा केल्या. त्यामुळे त्यांचे कार्य आणि योगदान आजही लोकांच्या मनात आदर्श म्हणून जिवंत आहे, आणि ते भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायक व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात

**८) महिलांचा समावेश आणि सशक्तीकरण: -**

त्यांच्या काळात महिलांचे स्थान उंचावण्यासाठी त्यांनी अनेक पावलें उचलली. अहिल्यादेवी होळकर यांच्या नेतृत्वामुळे महिला शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले. त्यांना शासनाचे महत्त्व आणि अधिकार मिळाले. त्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना प्रगती करण्याचे वाव देत होत्या.

**९) जन्म, मृत्यू व धर्मानुसार कर्मकांडांचे महत्त्व: -**

अहिल्यादेवी होळकर यांची सांस्कृतिक कार्ये केवळ स्थापत्यकला आणि धार्मिक स्थळांपुरती मर्यादित नव्हती. त्यांनी आपल्या राज्यातील लोकांना धर्म आणि संस्कृतीसंबंधी मार्गदर्शन देखील केले. विविध ठिकाणी अनुष्ठान, यज्ञ, आणि पूजा कार्यक्रम आयोजित केले, ज्यामुळे लोकधर्माचा व संस्कृतीचा प्रसार झाला.

**१०) सामाजिक एकता आणि धार्मिक सहिष्णुता: -**

अहिल्यादेवी होळकर यांनी समाजात एकता आणि धार्मिक सहिष्णुतेला महत्त्व दिले. त्यांचे राज्य विविध धर्म, जात, आणि संस्कृतीच्या लोकांसाठी खुले होते. त्यांनी सर्व धर्मांप्रती आदर दाखवला आणि अनेक वेळा विविध धार्मिक समारंभ आणि कार्ये एकत्रितपणे आयोजित केली.

**ड) उदाहरणे**

**1) अहिल्यादेवीच्या काळातील किल्ले व भुईकोट:-**

१) किल्ले महेश्वर २) चांदवडचा रंगमहाल ३) खडकी-पिंपळगाव: होळकर वाडा

४) काठापूर : होळकर वाडा किंवा वाघ वाडा ५) लासलगाव : अहिल्यादेवींचा किल्ला

६) वाफगाव- यशवंतराजे होळकर यांचे जन्मस्थळ ७) पंढरपूर: होळकर वाडा ८) पळशी: पळशीकर वाडा (होळकरांचे दिवाण)

९) इंदोरचा राजवाडा १०) रायकोट किल्ला कोंडाईबारी घाट

**2) अहिल्यादेवीच्या काळातील मंदिरे, बारव व धर्मशाळा: -**

१) काशी (वाराणसी): येथे त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराचे पुनर्निर्माण केले.

२) तुळजापूर: तुळजाभवानी मंदिराचा देखील पुनर्निर्माण करण्यात आला.

३) द्वारका: द्वारकाधीश मंदिराचे पायाभरणी आणि देखभाल.

४) गंगापूर: गंगापूर येथील प्रसिद्ध भगवान श्रीरामाचे मंदिर.

५) नाशिक: नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिराचे पुनर्निर्माण.

६) अकोले तालुका- विविध ठिकाणी विहिरी उदा. वाशेरे, वीरगाव, औरंगपूर.

७) अमरकंटक (मप्र)- श्री विघ्नेश्वर, कोटितीर्थ, गोमुखी, धर्मशाळा व वंश कुंड.

८) अलमपूर (मप्र) – हरीहरेश्वर, बटुक, मल्हारीमार्तंड, सूर्य, रेणुका,राम, हनुमानाची मंदिरे, लक्ष्मीनारायणाचे,मारुतीचे व

९) नरसिंहाचे मंदिर, खंडेराव मार्तंड मंदिर व मल्हाररावांचे स्मारक.

१०) अयोध्या (उ.प्र.)– श्रीरामाचे मंदिर, श्री त्रेता राम, श्री भैरव, नागेश्वर/सिद्धार्थ मंदिरे, शरयू घाट, विहिरी, स्वर्गद्वारी मोहताजखाना, अनेक धर्मशाळा.

११) उज्जैन (म.प्र.)– चिंतामणी गणपती, जनार्दन, श्री लीला पुरुषोत्तम, बालाजी तिलकेश्वर,रामजानकी रस मंडळ, गोपाल, चिटणीस, बालाजी, अंकपाल, शिव व इतर अनेक मंदिरे, १३ घाट, विहिरी व अनेक धर्मशाळा इत्यादी.

१२) काशी (बनारस) – काशी विश्वनाथ, श्री तारकेश्वर, श्री गंगाजी, अहिल्या द्वारकेश्वर, गौतमेश्वर व अनेक महादेव मंदिरे, मंदिरांचे घाट, मनकर्णिका, दशास्वमेघ, जनाना, अहिल्या घाट, उत्तरकाशी, रामेश्वर पंचक्रोशी, कपिलधारा धर्मशाळा, शीतल घाट.

१३) केदारनाथ – धर्मशाळा व कुंड

१४) कोल्हापूर (महाराष्ट्र) – मंदिर-पूजेसाठी साहाय्य.

१५) गंगोत्री –विश्वनाथ, केदारनाथ, अन्नपूर्णा, भैरव मंदिरे, अनेक धर्मशाळा.

१६) घृष्णेश्वर (वेरूळ) (महाराष्ट्र) – शिवालय तीर्थ.

१७) जगन्नाथपुरी (ओरिसा) – श्रीरामचंद्र मंदिर, धर्मशाळा व बगीचा.

१८) जळगांव (महाराष्ट्र) - राम मंदिर.

१९) जांबगाव – रामदासस्वामी मठासाठी दान.

२०) जेजुरी(महाराष्ट्र) – मल्हारगौतमेश्वर, विठ्ठल, मार्तंड मंदिरे, जनाई महादेव व मल्हार या नावाचे तलाव.

२१) त्र्यंबकेश्वर (नाशिक) (महाराष्ट्र)– कुशावर्त घाटावर पूल.

२२) द्वारका (गुजरात) – मोहताजखाना, पूजागृह व पुजाऱ्यांना काही गावे दान.

२३) नीलकंठ महादेव – शिवालय व गोमुख.

२४) पंचवटी (नाशिक)(महाराष्ट्र)– श्री राम मंदिर, गोरा महादेव मंदिर, विघ्नेश्वर मंदिर, धर्मशाळा, रामघाट.

२५) पंढरपूर (महाराष्ट्र) – श्री राम मंदिर, तुळशीबाग, होळकर वाडा, सभा मंडप, धर्मशाळा व मंदिरास चांदीची भांडी दिली. बाजीराव विहीर.

२६) प्रयाग (अलाहाबाद,उ.प्र.) - विष्णू मंदिर, घाट व धर्मशाळा, बगीचा, राजवाडा.

२७) बद्रीनारायण (उ.प्र.) –श्री केदारेश्वर मंदिर, हरिमंदिर, अनेक धर्मशाळा (रंगदचाटी, बिदरचाटी, व्यासंग, तंगनाथ, पावली) मनु कुंड (गौरकुंड व कुंडछत्री), देवप्रयाग येथील बगीचा व गरम पाण्याचे कुंड, गायींच्या चरण्यासाठी कुरणे.

२८) वृंदावन (मथुरा) – चैनबिहारी मंदिर, कालियादेह घाट, चिरघाट व इतर अनेक घाट, धर्मशाळा व अन्नछत्र.

२९) वेरूळ (महाराष्ट्र) – लाल दगडांचे मंदिर.

३०) श्री वैजनाथ (परळी,) (महाराष्ट्र)– सन १७८४ मध्ये वैद्यनाथ मंदिराचा जीर्णोद्धार.

३१) श्री शंभु महादेव पर्वत, शिंगणापूर (महाराष्ट्र) – विहीर.

३२) श्रीशैल मल्लिकार्जुन (कुर्नुल, आंध्रप्रदेश) – शिवाचे मंदिर

३३) संगमनेर (महाराष्ट्र)– राम मंदिर.

३४) सौराष्ट्र (गुजरात) – सन १७८५ मध्ये सोमनाथ मंदिर, जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा.

३५) हरिद्वार (उ.प्र.) – कुशावर्त घाट व मोठी धर्मशाळा.

**इ) संशोधन पद्धती:-**

१) प्राथमिक स्रोत: होळकरकालीन पत्रव्यवहार, आज्ञापत्रे आणि कोरीव लेख.

२) द्वितीयक स्रोत: प्रख्यात इतिहासकारांची पुस्तके (उदा. सर जदुनाथ सरकार, माल्कम यांचे लेखन).

३) तुलनात्मक अभ्यास: इतर समकालीन राज्यकर्ते आणि अहिल्यादेवींच्या कार्यपद्धतीची तुलना

**समारोप:-**

लोकमाता अहिल्याबाई होळकर या आजही 'माता' म्हणून स्मरणात आहेत कारण त्यांनी केवळ एक राज्य नव्हे, तर एक संस्कृती जपली. त्या भारतीय सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या आदर्श रूपात आपल्यासमोर उभ्या राहतात. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक कार्य केवळ स्थापत्यकला किंवा धार्मिक कार्यापुरते मर्यादित नव्हते, त्यांचे कार्य समाजातील प्रत्येक घटकासाठी महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी एक अखंड आणि सशक्त समाज निर्माण केला.

१३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांचं महेश्वर येथे त्यांचं निधन झालं. पण त्यांचा वारसा आजही जिवंत आहे. इंदूर विमानतळाला त्यांचं नाव देण्यात आलं आहे. त्यांचं कार्य आजही प्रेरणा देणारं आहे. त्या एक यशस्वी शासिका, समाजसेविका आणि स्त्रीशक्तीचं प्रतीक होत्या. आजच्या काळातही त्यांच्या जीवनातून आपण नेतृत्व, सेवा आणि सत्यनिष्ठा शिकू शकतो. यावरून स्पष्ट होते की अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि समर्पणाने भारतीय संस्कृतीचे रक्षण केले आणि राष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेला बळकटी दिली. त्यामुळेच इतिहासात त्यांचे स्थान केवळ एक शासक म्हणून नव्हे, तर सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या महान प्रतीक म्हणून मानले जाते. अशा या थोर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना शतशः प्रणाम.

**संदर्भ सूची:-**


१) *"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर"*, लेखक- वसंत पोतदार, प्रकाशक- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ. विशेषत्व: अहिल्यादेवींच्या जीवनातील प्रमुख टप्प्यांचं सखोल वर्णन.

२) *"राजमाता अहिल्यादेवी होळकर"*, लेखक- डॉ. श्री. ना. पेंडसे, प्रकाशक- साप्ताहिक विवेक प्रकाशन. विशेषत्व: ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषण आणि त्यांचे समाजकार्य.

३) *"Ahilyabai Holkar: The Philosopher Queen"*, लेखक- M. L. Ahuja, प्रकाशक- Rupa Publications. विशेषत्व: इंग्रजी भाषेतून अहिल्यादेवींचा विस्तृत परिचय.

४) *"Devi AhilyaBai Holkar"*, लेखक- Kusum Choppra, प्रकाशक- Writers Workshop, Kolkata. विशेषत्व: ऐतिहासिक कथा-शैलीत रचलेला चरित्रपर ग्रंथ.

५) *"अहिल्याबाई होळकर यांचा धर्म आणि समाजकार्य"*, लेखक- डॉ. सुधाकर क्षीरसागर, प्रकाशक- वैदर्भीय ग्रंथालय. विशेषत्व: धार्मिक व सामाजिक पैलूंवर सखोल अभ्यास.

६) *"इतिहास होळकर घराण्याचा"*, लेखक- डॉ. य. द. फडके, प्रकाशक- Continental Prakashan. विशेषत्व: होळकर घराण्याचा इतिहास व अहिल्याबाईंचे योगदान.

७) *"Women in Indian History"*, संपादक- B. R. Nanda, विशेषत्व- भारतातील महिलांच्या ऐतिहासिक योगदानात अहिल्याबाईंचा समावेश.

८) *"Encyclopaedia of Indian Women Through the Ages"*, लेखक- Simmi Jain, विशेषत्व: अहिल्याबाईंचे संक्षिप्त पण अभ्यासपूर्ण चरित्र.

९) *"तेजस्विनी अहिल्याबाई होळकर"*, विजया जहागीरदार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.